# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर.

फोन नं. ०७१७२-२५०२२०, २५५६५० (सामान्य प्रशासन विभाग) इ-मेल com.chandrapur@gmail.com

क्रमांक :- चंशमनपा/साप्रवि/२०२५/ ४६३ दिनांक ०६/०५/२०२४

## सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता (स्थापत्य) व सेवानिवृत्त सहायक नगररचनाकार या पदावर सेवाकरार पध्दतीने उपलब्ध करुन घेणे बाबत.

## जाहिर सुचना

चंद्रपूर शहर महानगरपालिकेतील शासनामार्फत चालविण्यांत येणाऱ्या लोकशाहीर अण्णाभाउु साठे, नागरी दलित वस्ती सुधार योजना, मुलभूत सोयी सुविधा, महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियान, अल्पसंख्यांक विकास मंडळ, जिल्हा वार्षिक सर्वसाधारण अनुदान, प्रधानमंत्री खनीज क्षेत विकास निधी, वैशिष्टपुर्ण कामासाठी विशेष अनुदान, ई-बस, सिव्हील अस डेपो प्रकल्प, अमृत योजना २.० भुमिगत गटारी योजना, इत्यादी योजना राबविणे करिता अडचण निर्माण होत असल्यामुळे शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता यांची करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी ०२ पदे भरण्यांची बाब विचाराधीन आहे.

तसेच चंद्रपूर शहर महानगरपालिका क्षेत्राच्या नागरीकरणांत मोठया प्रमाणात झालेली वाढ, केंद्र व राज्य शासनाचे महत्वाचे उपक्रम/संस्था/प्रकल्प/योजना यांचे अंमलबजावणी होणारे परिणाम व विविध जागा मागणी, भुसंपादन पट्टे वाटप, बांधकामे परवानग्या, गुंठेवारी तसेच अवैध बांधकाम व अतिक्रमण निर्मुलन इतयादी महत्वाची कामे करणे करिता अडचण निर्माण होत असल्यामुळे शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त सहायक नगर रचनाकार यांची सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी ०४ पदे भरण्यांची बाब विचाराधीन आहे.

करिता चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर शासनाकडील/महानगरपालिका सेवेतील सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांमधून सेवानिवृत्त, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) - ०२ पदे व सेवानिवृत्त, सहायक नगर रचनाकार - ०४ पदे या पदांसाठी सेवा करार पध्दतीने इच्छूक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागवित आहेत.

कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यां पदाकरिता इच्छूक उमेदवार महानगरपालिका अथवा सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) सेवेमधून सेवानिवृत्त झालेले असणे आवश्यक आहे. तसेच सहायक नगर रचनाकार या पदाकरिता इच्छूक उमेदवार महानगरपालिका अथवा शासकीय/निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले असणे आवश्यक आहे.

इच्छूक व पात्र उमेदवारांनी आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या छायांकीत प्रतीचा एक संच व मुळ प्रमाणपत्रासह मा. स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, मनपा चंद्रपूर येथे दिनांक १३/५/२०२५ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०२.०० वाजेपर्यत प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

याबाबत अर्जाचा नमुना व अटीशर्ती cmcchandrapur.com या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

| अ.क्र. | पदांचे नांव | पद संख्या |
|---|---|---|
| १ | सेवानिवृत्त, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | ०२ |
| २ | सेवानिवृत्त सहायक नगर रचनाकार | ०४ |

आयुक्त

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर.

प्रत :- ------------------------

यांचेकडे प्रसिध्दीसाठी पाठविण्यांत येत आहे. निविदा सूचना कमीत कमी जागेमध्ये प्रसिध्द करावी. तसेच निविदा सुचना प्रसिध्दी बिलाचे भुगतान शासकीय दरानें करण्यंत येईल. पालिकेचा जिएसटी नंबर बिलात नमूद करुन सोबत पेपरच्या पाच प्रती जौडाव्यात.

अटीशर्ती :-

१) सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१२, दिनांक १७/१२/२०१६ व शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१०० (भाग -१)/१३, दिनांक ०८/०९/२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहील.

२)

२) दिनांक ०८/०९/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार मासिक पारिश्रमिक वेतन व भत्ते लागू राहतील.

३) करारपध्दतीने नेमणूकीकरिता अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

४) सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यांत येणारी नियुक्ती ११ महिण्यांसाठी राहिल.

५) करार पध्दतीने नियुक्ती देण्यांत आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनबाबत/साामावून घेण्याबाबतचा अधिकार / हक्क नसेल.

६) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकाऱ्या विरुध्द विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

७) उमेदवार शारीरिक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

८) उमेदवाराने अर्ज सादर करतांना राहण्याचा संपूर्ण पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी नमूद करावे.

९) सेवा करार पध्दतीने नियुक्ती देण्यांत आलेल्या उमेदवाराला रुपये १००/- चे स्टॅम्पपेपरवर हमी देणे बंधनकारक राहील.

१०) नियुक्तीसाठी आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्यांचे अधिकार राहतील.

११) आवश्यकते प्रमाणे कमी अथवा जास्त पदे सेवा करार तत्वावर भरण्याबबातचा निर्णय घेण्यांचा अधिकार आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका यांना राहिल.

१२)

Paliwal

आयुक्त

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर.